शापुर्जी पालम आदि कंपन्यांचे उच्च अधिकारी उपस्थित होते.

## कुलगुरु करमळकर यांची वाघ शिक्षण संस्थेस भेट




नाशिक : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु नितीन करमळकर यांनी के. के. वाघ शिक्षण संस्थेस सदिच्छा भेट दिली. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विविध विभागांना भेट देऊन त्यांनी संस्थेच्या प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले. वर्तमान युगात नोकऱ्यांच्या मागे धावणारे विद्यार्थी निर्माण करण्यापेक्षा नोकरी प्रदान करणारे विद्यार्थी घडविणे आवश्यक आहे. येणाऱ्या भविष्यात उद्योजकता वाढीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी विद्यापीठ आणि संस्था यांनी एकत्रित येत विचार-विनिमय करून शिक्षणाचे प्रश्न सोडवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी पुणे विद्यापीठाचे विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. गायकवाड, अशोकभाई मर्चंट, मा. चांगदेवराव होळकर, समीर वाघ, प्रा. के. एस. बंदी, डॉ. के. एन नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. जी. वाघ, जनसंपर्क अधिकारी संजीव अहिरे व विविध समित्यांचे सदस्य आदी उपस्थित होते. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

**दै. लोकमत, दि. ०३-१०-२०१७**



# 'टेक्नोरायन' स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

आशिया खंडातील नामांकित तांत्रिक स्पर्धांपैकी एक असलेल्या आयआयटी 'टेक्नोफेस्ट' स्पर्धेत येथील के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजच्या एमसीए विभागातील तीन विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या प्रवेश केला आहे. राष्ट्रीय स्तरावर झालेल्या 'टेक्नोरायन' स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवून प्रथम वर्षातील तेजस ओझरकर, रिटा पंजाबी व निखिल पाटील हे विद्यार्थी आता आयआयटीतील 'टेक्नोफेस्ट'मध्ये सहभागी होणार आहेत. मुंबई विभागातून त्यांनी प्राथमिक फेरी पार केली होती.

आयआयटी मुंबई येथे 'टेक्नोरायन' या तांत्रिक स्पर्धेतर्गत 'व्हाईस क्लच' ही स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत वायरलेस रोबोट बनवून त्याचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले होते. विविध तांत्रिक आव्हानांना पार करून रोबोटची क्षमता त्यांना या स्पर्धेत सिद्ध करायची होती. मातीतून चालणे, चढउतार यांसारख्या अनेक आव्हानांची पूर्तता विद्यार्थ्यांनी केली. यासाठी सहा मिनिटांचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच पाच मिनिटात विद्यार्थ्यांनी हे आव्हान पूर्ण करत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांचे एमसीए विभागप्रमुख डॉ. वंदना बागल, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## इंटरव्ह्यूबाबत मार्गदर्शन

के. के. वाघ कॉलेजमध्ये इंजिनीअरिंगच्या शेवच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट पूर्व तयारी उपक्रम राबविण्यात आला. यात विद्यार्थ्यांना ॲप्टिट्यूड टेस्ट, एचआर आणि टेक्निकल इंटरव्ह्यू घेण्यात आला. त्यांना संभाषण कौशल्य, रेझ्युम लिहिणे आणि इंटरव्ह्यू संदर्भातील तंत्राबाबत औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या संकल्पनेंतर्गत ३५० हून अधिक विद्यार्थ्यांची मॉक प्लेसमेंट झाली आहे. या उपक्रमात कॉम्प्युटर आयटी, इलेक्ट्रॉनिक्स इंजीनिअरिंगच्या २०० विद्यार्थ्यांनी सहभाग तर फेज दोन अंतर्गत मेकॅनिकल, केमिकल, प्रोडक्शन इंजीनिअरिंग विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्राचार्य डॉ. केशव नंदुरकर, ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर डॉ. प्रमोद शहाबादकर सोबत प्रा. संदीप वाघ यांनी या उपक्रमासाठी प्रयत्न केले.

## एनएसएस युनिटचे यश

के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे दिला जाणारा वार्षिक बेस्ट युनिट व कॉलेजचे एनएसएस प्रमुख प्रा. नानासाहेब गुरुळे यांना बेस्ट प्रोग्रॅम ऑफिसर या दुहेरी पुरस्कार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी रोजी जाहीर झाले आहेत. स्वच्छता, स्वास्थ्य, ग्रामीण शिक्षण, पर्यावरण व सामाजिक जनजागृतीच्या क्षेत्रात उल्लेखनीय निःस्वार्थ श्रमदान केल्याबद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये या युनिटतर्फे आयोजित रक्तदान शिबिर, कॉलेज कॅम्पस व जवळपास राबवलेल्या स्वच्छता मोहीम, चितेगाव दत्तक घेऊन तेथे पाट बंधरे बांधणे यासारखे उपक्रम यामध्ये राबविण्यात आले.

**(संकलन : मयुरी माळी, योगेंद्र देवरे, कल्पेश उघाडे, अक्षय शिनकर, अक्षय सराफ, यश कुलकर्णी )**

**दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. ०२-१०-२०१७**